# ठाणे महानगरपालिका, ठाणे

जाहिरात

विषय : कोरोना विषाणु (कोव्हिड १९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी ग्लोबल इम्पॅक्ट हब, एक हजार खाटांचे रुग्णालय (DCH) रुस्तुमजी कॉम्प्लेक्स, बाळकुम रोड, ठाणे, करीता ठाणे महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्लोबल इम्पॅक्ट हब, एक हजार खाटांचे रुग्णालय (DCH) रुस्तुमजी कॉम्प्लेक्स, बाळकुम रोड, ठाणे, या उपाययोजना करण्याकरिता ठाणे महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी खालील नमुद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने त्यांचे अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसात संपूर्ण तपशीलासह भरावीत. (संकेतस्थळावर ई-सुविधा या सदराखाली भरती (Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the Post of Intensivist, Nurses- GNM/BSC nursing, Nurses ANM, MO -MBBS, MO - AYUSH या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | एकुण पदांची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | Intensivist | MD / DNB Med / Anesthesia / Critical care / Chest with IDCCM / MBBS, DA / MBBS, DTCD with IDCCM with 2-3 years experience in ICU | १५ | रु.२,५०,०००/- |
| २. | (परिचारीका) Nurses-GNM/BSC nursing | GNM / BSC Nursing with 1-2 years of experience | २५० | रु.३०,०००/- |
| ३. | (प्रसाविका) Nurses ANM | ANM with 2-3 years of experience | १५० | रु.२५,०००/- |
| ४. | (वैद्यकीय अधिकारी) Medical Officer -MBBS | MBBS with 1-2 years of experience | ४० | रु.८०,०००/- |
| ५. | (वैद्यकीय अधिकारी - आयुर्वेदिक) Medical Officer - AYUSH | BAMS, BUMS, BHMS with 1-2 years of experience | ४० | रु.६०,०००/- |

**अर्ज भरण्याबाबतच्या तसेच ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या सुचना:-**

१.www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर (ई-सुविधा या सदराखाली (भरती /Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the Post of Intensivist, Nurses- GNM/BSC nursing, Nurses ANM, MO -MBBS, MO - AYUSH या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे. सदर जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२.ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या "Apply" या ठिकाणी क्लिक करावे. त्यानंतर भ्रमणध्वनीची वैधता तपासण्यासाठी माहिती भरावी. "send OTP" वर क्लिक केल्यावर अर्जदाराच्या भ्रमणध्वनीवर आलेला OTP क्रमांक नमुद करुन अर्ज भरण्याची पुढील कार्यवाही करावी.

३.अर्जदाराचे भ्रमणध्वनीवर युजर आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. त्यास जतन करावे.

४.पत्रव्यवहाराचा स्वत:चा पत्ता लिहावा व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

५. उमेदवाराने आपला वैध ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अंतिम निकाल लागेपर्यंत कार्यरत असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनीवर संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना ठाणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. मुलाखतीबाबतचा संदेश ई-मेल / एस.एम.एस द्वारे कळविण्यात येईल. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

६. उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७.उमेदवाराने अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

८. उमेदवारांस ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदांची जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करीत असल्याची व अन्य आवश्यक कागदपत्रे मुलाखतीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

९. आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही. केवळ मुलाखत दिल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेचा अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१०.उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर सबमिट (Submit) केल्यावर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

११. अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे, निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

१२. पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट मुळाखतीच्या वेळी तसेच कागदपत्र तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१३. संपुर्णपणे कंत्राटी संदर्भातील सर्व माहिती व त्या अनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे माहिती दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मागवून माहिती मिळाली नाही तरी ही, तक्रार करता येणार नाही. तक्रार केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

१४.ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातील संगणीकीय प्रणाली संदर्भात अडी अडचणी असल्यास po@thanecity.gov.in या ई-मेल आयडीवर हरकती घेण्यात येतील अडचणीचे निराकरण करुन ई-मेल आयडीवर संदेश पाठविण्यात येईल उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे

१५. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१६. ऑनलाईन अर्ज भरताना शेवटच्या दिवशी एकाच वेळी अनेक ठिकाणाहुन इच्छुक उमेदवार अर्ज भरत राहीले तर तांत्रिक अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी उमेदवारानी शेवटच्या दिवसाची अंतिम कालावधीची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज सादर करावा. याबाबत उमेदवारास अर्ज सादर करण्यासाठी कोणतीही वाढीव मुदत देण्यात येणार नाही. तसेच यासंबंधित कोणतीही तक्रार दाखल करता येणार नाही. अशा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**विशेष सूचना :-**

१.सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता (Draft List) यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्या प्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधुन कंत्राटी पध्दतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

२. उपरोक्त पदांकरीता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत.

३. पदभरतीच्या अटीशर्तीमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहिल.

४. महापालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही महापालिकेच्या अभिलेखाचा भाग होईल.

५. जर एखाद्या उमेदवाराने कंत्राटी भरती कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

६. यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

७. उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशील देऊ नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये.

ठामपा/पिआरओ/आस्था/१०६/२०२०-२१

दि:२९.०५.२०२०

सही/-

(विजय सिंघल, भाप्रसे)

महापालिका आयुक्त

ठाणे महानगरपालिका, ठाणे

***pls visit our official web-site***

***www.thanecity.gov.in***

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**